Conv.

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

क्रमांक : चंशमनपा/आवि/कोरोना विषाणु/ १९ /२०२१ दिनांक : ०६/०४/२०२१

**आदेश :-**

SVAMC
IW No.. 292
Date.. 07/04/2021

वाचा :-

१. साथरोग अधिनियम, १८९७
२. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३. महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम २०२०, दि.१४.०३.२०२०

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने (कोव्हिड-१९) उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हिड-१९, उपाययोजना नियम-२०२० यातील नियम ३ नुसार शहरी भागात आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे व ज्यांना कार्यक्षेत्रातील कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहिर केले आहे.

ज्याअर्थी, या कायद्याच्या नियम १० अन्वये आयुक्त, महानगरपालिका यांना (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, चंद्रपुर जिल्हा स्तरावर तसेच चंद्रपुर मनपा कार्यक्षेत्रांतर्गत कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव व प्रसार यात झपाट्याने वाढ होत असून कोरोना विषाणूमुळे होणारा (कोव्हिड-१९) आजाराबाबत चंद्रपुर शहर महानगरपालिका हद्दीत दक्षता घेण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहे. या अनुषंगाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी करण्याच्या उद्देशाने उचित पावले उचलणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, चंद्रपुर जिल्हयातील अनुभव लक्षात घेता, कोरोना विषाणूचा संसर्ग चक्राकार पध्दतीने (Exponentail) पसरतो या अनुभवाच्या आधारे कोरोना विषाणुचा संसर्ग कमी करण्याकरिता व्यक्तीमध्ये भौतिक दृष्ट्या कमीत कमी संपर्क येणे आवश्यक आहे, आणि

ज्याअर्थी, भौतिक दृष्ट्या कमीत कमी संपर्क येणेकरिता कोरोना बाधीत व्यक्ती तसेच अशा व्यक्तीच्या संपर्कामध्ये आलेल्या व्यक्तीचे विलगीकरण करणे आवश्यक असून अशा व्यक्तींना संस्थात्मक विलगीकरण कक्षात ठेवणे आवश्यक आहे व अशा व्यक्तींना विलगीकरण करण्यास्तव / कोविड केअर सेंटर (CCC) करिता विविध संस्थाच्या इमारती ताब्यात घेणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी राजेश मोहिते, आयुक्त, चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपुर मला महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० चे नियम १० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील अनुषंगीक तरतूदीन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन **श्रीमती विमलादेवी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, वांढरी, घुग्गुस रोड, चंद्रपुर येथील संबंधित ईमारतीसह १०० Bedded आयुर्वेदिक हॉस्पिटल याद्वारे तात्काळ प्रभावाने अधिग्रहित करित आहे.**

त्याअनुषंगाने संबंधित ईमारत धारकांनी तेथील आवश्यक त्या सुविधांबाबत जसे की, पाणी विज, मल:निस्सारण इत्यादी बाबींची पूर्तता करुन नमूद १०० Bedded आयुर्वेदिक हॉस्पिटल मधील सर्व खोल्या, सर्व साहित्य तसेच, तेथील मनुष्यबळ तातडीने वैद्यकिय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका, चंद्रपुर यांना हस्तांतरीत करावे. यामध्ये कुठलीही हलगर्जी आढळल्यास उपरोक्त कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

-स्वा-

**सक्षम अधिकारी तथा आयुक्त**
**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. मा. पोलिस अधिक्षक, चंद्रपुर शहर, चंद्रपुर नमूद ठिकाणी आवश्यक पोलिस बंदोबस्त उपलब्ध करुन देणेस्तव.
२. सहाय्यक आयुक्त, झोन क्र. ३, महानगरपालिका, चंद्रपुर.
३. शहर अभियंता, बांधकाम विभाग, महानगरपालिका, चंद्रपुर.
४. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका, चंद्रपुर
५. विभाग प्रमुख, स्वच्छता विभाग, महानगरपालिका, चंद्रपुर
६. विभाग प्रमुख, विद्युत विभाग, महानगरपालिका, चंद्रपुर

**प्रत माहितीस सविनय सादर :-**

१. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर जिल्हा, चंद्रपुर.
२. इंन्सिडंट कमांडर - कोविड १९ तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपुर.

**प्रत,**

**प्राचार्या,**
श्रीमती विमलादेवी आयुर्वेदिक मेडीकल
कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, वांढरी, चंद्रपुर.

**सक्षम अधिकारी तथा आयुक्त**
**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर**